आकाशवाणी पुणे

प्रादेशिक वृत्त विभाग

पुणे वृत्तांत

वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक- 22.11.2024 वार – शुक्रवार

---

पुणे मत मोजणी

विधानसभा निवडणूकीसाठी पुणे जिल्ह्यांत 21 मतदार संघांत 61 टक्के मतदान झालं. मतमोजणी उद्या होणार आहे. पुणे शहरातील आठ मतदार संघांची मतमोजणी कोरेगांव पार्क इथल्या भारतीय खाद्य महामंडळाच्या गोदामात, पिंपरी आणि भोसरी विधानसभा मतदार संघाची मतमोजणी बालेवाडी इथे तर चिंचवड विधानसभा मतदार संघाची मतमोजणी शंकरराव गावडे स्मृति भवनात- सकाळी आठ वाजता सुरू होईल. जिल्ह्यातल्या 21 विधानसभा मतदार संघांसाठी मतमोजणीच्या 465 फेऱ्या होतील. ग्रामीण भागातील विधानसभा मतदार संघातील मतमोजणी त्या त्या भागात होईल, असं जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी सांगितलं.

मतमोजणी

विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणी करता पुण्यात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. 2500 पोलीस अंमलदारांसह 4 अपर पोलिस आयुक्त, 11 उपायुक्त, 19 सहायक आयुक्त, 350 पोलीस अधिकारी, केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या 12 तुकड्या, राज्य राखीव दलाच्या दोन तुकड्या आणि शीघ्र कृती दल असा फौज फाटा तैनात करण्यात येणार आहे. मत मोजणीमुळे कोरेगाव पार्क धान्य गोदाम परिसरातील वाहतुकीतही बदल करण्यात येणार आहे.

कारवाई

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीत पुणे जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाने राज्यात सर्वाधिक 25 टक्के, म्हणजे 7 कोटी 63 लाख 34 हजार रुपयांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती- जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल डॉ. दिवसे यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पुणे जिल्हा अधीक्षक चरणसिंह राजपूत यांचं अभिनंदन केलं आहे. दरम्यान उद्या सर्व विधानसभा मतदार संघांचे अधिकृत निकाल जाहीर होईपर्यंत जिल्ह्यातील मद्य विक्रीला मनाई करण्यात आली आहे. यसंबंधीची तक्रार टोल फ्री क्रमांक 1800 233 9999 किंवा 020-2612 7321या क्रमांकावर देता येणार आहे.

सीबीएसई

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ CBSE ने एकच कन्या अपत्य असणाऱ्या गुणवान विद्यार्थिनींच्या शिष्यवृत्तीकरता पात्र विद्यार्थिनींकडून ऑनलाइन अर्ज मागवले आहेत. 2024 वर्षात CBSE च्या 10वी उत्तीर्ण झालेल्या तसंच CBSE-संलग्न शाळांमध्ये इयत्ता 11वीत शिकत असलेल्या एक कन्या अपत्याकरता CBSE मेरिट स्कॉलरशिप योजनेसाठी हे अर्ज मागवले आहेत. याशिवाय, 2023 मधल्या शिष्यवृत्तीच्या च्या नूतनीकरणासाठीही ऑनलाइन अर्ज मागवण्यात आले आहेत. ऑनलाइन अर्ज 23 डिसेंबरपर्यंत CBSE च्या संकेतस्थळावर भरता येतील.

सीएनजी

आंतरराष्ट्रीय बाजारात नैसर्गिक वायू दर वाढल्यामुळे पुणे-पिंपरी-चिंचवडमधल्या सीएनजीच्या दरात काल मध्यरात्रीपासून प्रतिकिलो दोन रुपयांची वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडकडून-एमएनजीएल कडून पुणे, पिंपरी-चिचवडसह चाकण, तळेगाव, हिंजवडमध्ये सीएनजी पुरवठा केला जातो. या दरवाढीमुळे सीएनजीचा दर प्रतिकिलो 87 रुपये 90 पैसे झालं आहे. याआधी 8 सप्टेंबर रोजी सीएनजीच्या दरात प्रतिकिलो 90 पैसे वाढ झाली होती.

संविधान

भारतीय संविधानाच्या यंदाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने 'भारतीय संविधानाची 75 वर्षे.. विकास आणि वाटचाल' या विषयावर 'भारतीय संविधान विचार संमेलन' आयोजित करण्यात आलं आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वक्ते सहभागी होणार असल्याची माहिती महोत्सव समितीचे अध्यक्ष सचिव परशुराम वाडेकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

प्रदर्शन

भारत हा कृषिप्रधान देश असून आहे. सध्या घरातील गॅलरीमध्ये, अंगणात, परस बागेत विविध वाणाची फळझाडं आणि फुलझाडं मोठ्या प्रमाणात लावली जात असून त्यांना मोठी मागणी आहे. म्हणून शेतकऱ्यांनी या व्यवसायाला जोड-व्यवसाय म्हणून प्राधान्य देण्याचं आवाहन निबे डिफेन्स कंपनीचे संचालक गणेश निबे यांनी केलं आहे. वसू इव्हेंट आणि हॉस्पिटॅलिटी तसंच महाराष्ट्र नर्सरीमेन असोसिएशन यांच्या वतीने फुलोत्पादन, बागायती, फ्लोरीकल्चर, आणि संबंधित प्रगत प्रक्रिया तंत्रज्ञान आधारित; देशातलं सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. हे प्रदर्शन परवा 24 नोव्हेंबर रोजी सिंचनगर इथल्या कृषी महाविद्यालय मैदानावर सकाळी 10 ते संध्याकाळी 7 वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुलं आहे.

क्रिकेट

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने सुरू असलेल्या 'एमए आर लीग' अजिंक्यपद करंडक क्रिकेट स्पर्धेत अनस्टॉपेबल इलेव्हन संघाने, वॉरीयर टायटन्स्चा 9 गडी राखून सहज पराभव केला. अन्य दुसऱ्या सामन्यात लिजंड्स इलेव्हनने, इनव्हिजन क्लबचा 9 धावांनी निसटता पराभव केला आहे.

हवामान

पुणे आणि परिसरात उद्या आकाश निरभ्र राहील. कमाल तापमान 31 अंश तर किमान तापमान 14 अंश सेल्सियस राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,